# पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१० २०६

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत मौजे- आडिवली राष्ट्रीय महामार्ग (NH-४) लगतचा सर्व्हे नं. १६ पासुन ते मौजे- रोहिंजण येथील सर्व्हे नं. १० पर्यंतच्या २४.०० मी. रूंदीच्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८(४) अन्वये दि. २५/०६/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या विकास योजनानुसार २४.०० मी. रूंद रस्ता प्रस्तावित केला असून सदर रस्त्याखालील मौजे- आडिवली येथील सर्व्हे नं. ७७ येथील रस्त्याने बाधित जागा पनवेल महानगरपालिकेच्या नावे असून सदर रस्त्यामधुन सर्व्हे नं. ७७ या भूखंडाचे दोन भागात विभाजन झाले आहे. सदर भूखंड क्र. १ मध्ये बांधकाम परवानगी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच भूखंड क्र. २ ची लांबी / रूंदी कमी असल्यामुळे त्या जागेवर बांधकाम करणे शक्य नसल्यामुळे सदर ना-बांधिव (Non-Buildable) क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी.आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन :- मौजे- आडिवली, ता. पनवेल येथील मे. साईयोगी डेव्हलपर्स एल.एल.पी. तर्फे भागीदार श्री. अजय नरेश बाहरी व इतर १ यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील ना-बांधिव (non-Buildable) क्षेत्र पुढीलप्रमाणे :-

१) मौजे- आडिवली, सर्व्हे नं. ७७ ना-बांधिव (non-Buildable) क्षेत्र — ४३८.६५५ चौ. मी.

त्यास मोजणी नकाशानुसार चतु:सीमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस : ला.ग.नं. ११
पश्चिमेस : ला.ग.नं. ७८
दक्षिणेस : ला.ग.नं. ७६
उत्तरेस : ला. गट नं. १२

टिप :- उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

सहाय्यक संचालक नगररचना
पनवेल महानगरपालिका,

जा क्र. - पमपा/नरवि/टिडीआर/२६-२६/ ४१ /२०२६

दिनांक : २२/०१/२०२६

टिप - सदरची जाहीर नोटीस पनवल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.